**मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारा वरच्या पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता निश्चित करण्याबाबत अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी सचिव समिती स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१९/प्र.क्र.१३१अे/१६-ब**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १३ ऑगस्ट, २०२०.

**शासन निर्णय :**

राज्य शासन सेवेतील विविध संवर्गातील पदे ही मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेमार्फत भरण्यात येतात. सदर पदे ही पदोन्नतीचे आरक्षण लावून भरण्याची कार्यवाही यापूर्वी करण्यात येत होती. तथापि, मा. उच्च न्यायालयाने दि.४.०८.२०१७ च्या आदेशान्वये पदोन्नतीमधील आरक्षण रद्दबातल ठरविले आहे. त्यामुळे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारा वरच्या पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता निश्चित करण्याबाबत अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी सचिव समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार अप्पर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे सचिव समितीची स्थापना करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | अध्यक्ष |
| अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण विभाग) | सदस्य |
| अपर मुख्य सचिव (अपिल व सुरक्षा), गृह विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव (विधि व न्याय विभाग) | सदस्य |
| सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य-सचिव |

२. सदर समितीने आपल्या शिफारशी दोन महिन्यात शासनास सादर कराव्यात.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२००८१३१३४९१४१३०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shivdas Mahadeo Dhule

Digitally signed by Shivdas Mahadeo Dhule
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd353a6a1af02b28757a9a542f2f807ba459543ed19dc809f2f150cfde4470c9, serialNumber=55231903025208911890f58514593563e9788a66733f9a7e0d1a454083659841, cn=Shivdas Mahadeo Dhule
Date: 2020.08.13 13:56:40 +05'30'

**( शि. म. धुळे )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. मा.सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

४. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद

५. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा
६. सर्व विधान सभा सदस्य/ विधान परिषद, सदस्य
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
८. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग
९. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण विभाग)
१०. अपर मुख्य सचिव (अपिल व सुरक्षा), गृह विभाग
११. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग
१२. प्रधान सचिव (विधि व न्याय विभाग)
१३. सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग
१४. मा.अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा)
१६ प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद)
१७. निवडनस्ती.